महाराष्ट्र पोलीस

पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
( स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव )
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID : sp.jalgaon@mahapolice.gov.in
pilcb.jalgaon@gmail.com

दिनांक ०६/०२/२०२६

प्रति,

-: प्रेस नोट :-

मा.संपादक ,
दैनिक ----------------

विषय :- **पद्मालय शिवार (एरंडोल) येथील अंधाऱ्या खुनाचा छडा; जळगाव पोलिसांची मोठी कामगिरी, आरोपी जेरबंद**

===0000===

सदर घटणे थोडक्यात हकीकत अशी की, दिनांक ०४/०२/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास पद्मालय वनपरिक्षेत्रात एका महिलेचा व्यक्तीचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाची ओळख मिटवण्यासाठी आरोपीने चेहरा आणि छातीचा भाग ज्वलनशील पदार्थ टाकून पूर्णपणे जाळला होता. याप्रकरणी एरंडोल पोलीस ठाण्यात गुरनं. १६/२०२६, भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम १०३(१) आणि २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

जळगाव जिल्हयातील एरंडोल पोलीस ठाण्याच्या हद्दीत पद्मालय ते नागदुली रस्त्यावरील जंगलात एका अज्ञात महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह विद्रूप अवस्थेत असल्याने ओळख पटवणे हे मोठे आव्हान होते. तसेच डोगराळ परिसर व घनदाट जंगल असल्याने मानवी वरदळ नसल्याने सदरचा मृतदेह हा कोणाच्या निदर्शनास येणार नाही अशा परिस्थती निर्जन स्थळी पडलेल्या अवस्थेत होता.

सदर घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक (जळगाव) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा जळगाव चे अधिकारी व अंमलदार की यांचे 4 पथके तयार करुन यांनी अत्यंत कौशल्याने तपास करून केवळ ४८ तासांत या गुन्ह्याचा छडा लावला असून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

- मृतदेहाच्या पायाच्या नखांवरील 'मॅजंटा' रंगाचे नेलपॉलिश आणि डाव्या नाकपुडीतील सोन्याची 'मुर्नी' हे ओळखीचे मुख्य धागे ठरले.
- फॉरेन्सिक तज्ञांनी मृतदेहावरील अळ्यांच्या (Maggots) वाढीवरून मृत्यूचा काळ ३० किंवा ३१ जानेवारी (शुक्रवार/शनिवार) असल्याचे निश्चित केले.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार तसेच घटनास्थळावरील भौतीक व वस्तू जन्य पुरावा आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी नामे गोलू उर्फ स्वप्नील अशोक पाटील , रा.पहूर ता.जामनेर यास ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. प्राथमिक माहितीनुसार मयत आकाक्षा उर्फ अजय हेमराज गेड्रे रा.सोनसरार खैरागड जि.राजनाथगांव राज्य-छत्तीसगड हिच्याशी असलेल्या प्रेमसबंधाच्या वैयक्तिक वादातून आणि रागाच्या भरात डोक्यात प्रहार करून तसेच ओढणीच्या सहाय्याने गळा आवळून हत्या करण्यात आली आणि त्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेहावरील कपडे काढून मोटार सायकल मधील पेट्रोल काढून ते मृतदेहावर टाकून जागीच जाळण्याचा प्रयत्न केला होता. त्यातून तिचा अर्धवट मृतदेह जळाला होता. अशी कबुली दिली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री.महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती.कविता नेरकर, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विनायक कोते यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, राहुल गायकवाड, पोलीस उप निरीक्षक सोपान गोरे, शरद बागल, जितेंद्र वल्टे, पोलीस अंमलदार ईश्वर पाटील, पहूर पो.स्टे. कडिल पोलीस अंमलदार विनोद सुभाष पाटील तसेच स्थानिक गुन्हा शाखा, जळगांव कडिल सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार जळगाव पोलीस दलाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**जन सपर्क अधिकारी,**